rtmnuonline.com

**NJR/KS/18/6885**

**Bachelor of Arts (B.A.) Part—II Semester—III Examination**

**MARATHI (Literature)**

**(Optional)**

Time : Three Hours] [Maximum Marks : 80

**N.B. :—** (1) **पाचही** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. संत तुकारामकालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचे स्वरूप विशद करा. 16

**किंवा**

संत तुकारामांचे व्यक्तित्त्व आणि वाङ्मयीन कार्य सोदाहरण स्पष्ट करा.

2. संत तुकारामांच्या अभंग रचनातील समाजप्रबोधनाचे स्वरूप स्पष्ट करा. 16

**किंवा**

संत तुकारामांच्या अभंगातील नामसंकीर्तनाचे स्वरूप सोदाहरण विशद करा.

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** वाक्यांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा : 16

**गट—अ**

(क) आम्ही पापी तूं पावन,
हे तो पूर्वापार जाण.
नवें करूं नये जुनें,
सांभाळावे ज्याचे तेणें

(ख) धवळले जगदाकार,
आंधार तो निरसला.
लपो जाता नाही ठाव,
प्रकट पाहे पसारा.

(ग) जे कां रंजले गांजलें
त्यासी म्हणे जो आपुले
तो चि साधु ओळखावा
देव तेथें चि जाणावा.

(घ) जोजेनिया धन उत्तम व्यव्हारें,
उदास विचारे वेचे करी.
उत्तम चि गती तो एक पावेल,
उत्तम भोगील जीव खाणी.

**किंवा**

**गट—ब**

(च) आपुले मरण पाहिलें म्या डोळा,
तो जाला सोहळा अनुपम्य.
आनंदे दाटली तिन्ही त्रिभुवनें,
सर्वात्मकपणे भोग जाला.

rtmnuonline.com

(छ) शुद्धबीजा पोटीं, फळें रसाळ गोमटी.
मुखी अमृतांची वाणी, देह वेचावा कारणीं.

(ज) अज्ञानाची भक्ति इच्छितो संपत्ती,
तयाचिये मती बोध कैंचा.
अज्ञानाची पुजा क्रामिक भावना,
तयाचिया ध्याना देव कैंचा.

(झ) दया तिचें नावं भूतांचे पाळण
अणीक निर्दळण कंटकाचे.
पाप तिचें नाव न विचारितां नीत,
भलतें चि उन्मत्त करी सदा.

4. कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :– 16

**गट–क**

(त) ललित कलांचे स्वरूप समजावून सांगा.

(थ) जगन्नाथ यांची काव्यविषयक भूमिका स्पष्ट करा.

(द) 'अर्थप्राप्ती' या काव्यप्रयोजनाचे स्वरूप स्पष्ट करा.

(ध) मम्मटाने तत्काल प्राप्त होणारा उच्च आनंद हे सर्वश्रेष्ठ काव्यप्रयोजन का मानले ?

**किंवा**

**गट–ड**

(प) ललित साहित्य व ललित्तेतर साहित्य यातील साम्यभेद स्पष्ट करा.

(फ) क्षेमेंद्र यांची 'औचित्य' विषयक भूमिका स्पष्ट करा.

(ब) 'ध्वनी' हाच काव्याचा आत्मा असे आनंदवर्धन का म्हणतो ?

(भ) 'अशुभनिवारण' हे काव्यप्रयोजन समजून सांगा.

5. **सर्व** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :– 16

(1) संतांच्या स्वभावाच्या कोणत्या दोन बाजू संत तुकारामांनी सांगितलेल्या आहे ?

(2) 'कानडीने केला मऱ्हाटा भ्रतार, एकाचे उत्तर एका न ये', या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

(3) संत तुकारामांच्या मते खरा साधू कसा ओळखला पाहिजे ?

(4) संत तुकारामांनी पळपुट्या शिपायाचे वर्णन कसे केले आहे ?

(5) जगन्नाथांची काव्याची व्याख्या लिहा.

(6) मम्मटाच्या मते वाङ्मयाचे तीन प्रकार कोणते ?

(7) 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ कोणी लिहिला व कशाशी संबंधित आहे ?

(8) 'अर्थप्राप्ती' हे काव्यप्रयोजन लेखकाचे आहे, असे मम्मट का म्हणतो ?